**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१३**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :-७/०१/२०१२

प्रति,
मा. ---------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची **सभा क्र.१३ बुधवार दि. ११/१/२०१२ रोजी दुपारी १.०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये

**बुधवार दिनांक- ११/१/२०१२ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| ७० | मा.स्थायी समिती सभा क्रमांक- १२ मंगळवार दिनांक २७/१२/२०११ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे. |
| ७१ | अहमदनगर महानगरपालिकेच्या पिंपळगाव माळवी तलाव येथील निकामी झालेल्या पंपींग मशिनरी / साहित्याची लिलाव पध्दतीने विक्री करणेकामी आवश्यक उपाययोजना करून पुढील कार्यवाही करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट मंजूरीस्तव. |
| ७२ | अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा अत्यावश्यक सेवेकरीता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात विद्युत पर्यवेक्षक, विजतंत्री , जोडारी, पंपचालक या तांत्रिक पदांवर अटी व शर्ती नुसार मानधनावर करारबध्द नियुक्ती करीता थेट पध्दतीने उमेदवारांच्या मुलाखती बाबत वर्तमान पत्रामध्ये जाहिरात प्रसिध्दीस देणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ७३ | अहमदनगर महानगरपालिकेचे हद्दीतील रस्ता बाजु मांडणी फी ची वसुली खाजगी तत्वावर करणेकामी श्री. साई पेस्ट कंट्रोल यांनी दिलेल्या प्रस्तावानुसार निविदा दर रक्कम रूपये २५,०२,५०१/-चे निविदेतील अटी व शर्तीनुसार दरास मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ७४ | अहमदनगर महानगरपालिकेचे मुकुंदनगर येथे १५.०० लक्ष लिटर क्षमतेची उंच टाकी बांधणे व तार कंपाउड करणेकामी रक्कम रूपये २,४३,१२९/-चे अतिरीक्त खर्चास कार्यात्तर मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |

P.T.O.

| | |
|---|---|
| ७५ | अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना करीता डॉ. रूपाली आनंद कुलकर्णी यांची तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकिय अधिकारी या पदावर अटी व शर्ती प्रमाणे कंत्राटी करारानुसार मानधनावर करार बध्द नेमणूकीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ७६ | अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना करीता डॉ. कांचन सुरेंद्र रच्चा यांची तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकिय अधिकारी या पदावर अटी व शर्ती प्रमाणे कंत्राटी करारानुसार मानधनावर करार बध्द नेमणूकीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत**- १] विषय क्र. ७० - मा.स्थायी समिति सभा क्रमांक- १२ मंगळवार दिनांक २७/१२/२०११ रोजीच्या सभेच्या इतिवृत्ताची प्रत

२] विषय-क्रमांक- ७१ ते ७६ च्या प्रस्तावाच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१३**

विषय क्रमांक-७० बुधवार दिनांक ११/०१/२०१२

ठराव क्रमांक-७० बुधवार दिनांक ११/०१/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक- १२ मंगळवार दिनांक २७/१२/२०११ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकूर :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक- १२ मंगळवार दिनांक २७/१२/२०११ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेसाठी मा. स्थायी समिती पुढे ठेविले.
सबब कार्यवृत्त मा. स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

हा विषय सभेमध्यें वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- मागील सभा दिनांक २७/१२/२०११ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री.भोसले ग.पुं. :- मागील सभा दिनांक २७/१२/२०११ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यात यावी.

मा.सौ. गायकवाड नि. व. :- मागील सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- मा.स्थायी समिती सभा क्र.१२ मंगळवार दिनांक २७/१२/२०११ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक- १२ मंगळवार दिनांक २७/१२/२०११ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक :- मा.श्री. भोसले गणेश पुंडलिक. सही /-

अनुमोदक :- मा.सौ. गायकवाड निलीमा वसंत सही /-
ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती ,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१३**

विषय क्रमांक-७१ बुधवार दिनांक ११/०१/२०१२

ठराव क्रमांक-७१ बुधवार दिनांक ११/०१/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या पिंपळगाव माळवी तलाव येथील निकामी झालेल्या पंपींग मशिनरी / साहित्याची लिलाव पध्दतीने विक्री करणेकामी आवश्यक उपाययोजना करून पुढील कार्यवाही करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट मंजूरीस्तव.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अ.नगर मनपा शहर पाणी पुरवठा विभाग जा.क्र. १२५३ दि.२३/१२/२०११

प्रस्तावना- विषय-अहमदनगर महानगरपालिकेच्या पिंपळगाव माळवी तलाव येथील निकामी झालेल्या पंपीग मशिनरी बाबत.

**टिप्पणी-** अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीचा पिंपळगाव माळवी तलावातून मुळाधरण बांधणेच्या पूर्वी [सन १९७३-७४] नगर शहरास पाणी पुरवठा होत असे. मुळाधरण अस्तित्वात आले पासून पिंपळगाव माळवी पाणी पुरवठा योजना बंद करण्यात आली. तद्नंतर सन १९८५ च्या दरम्यान मुळाधरण येथून कार्यरत पाणी पुरवठा योजनेचे पाणी कमी पडू लागल्याने पिंपळगाव येथे ६० एच.पी.चे दोन पंप बसवून तेथून पाणी पुरवठा चालू करण्यात आला.

परंतु काही काळानंतर तांत्रिक अडचणीमुळे पिंपळगाव येथील पाणी योजना बंद करण्यात आली. सदर योजना सुमारे २५ वर्षापासून बंद असल्याने तेथील काही मशिनरी निकामी झालेली आहेत.

पिंपळगाव माळवी पाणी पुरवठा योजनेसाठी तत्कालीन परिस्थितीत बसविलेले डिझेल इंजिन संच व इतर मशिनरी, यंत्रसामुग्री सद्यस्थितीत पूर्णपणे निकामी झालेली आहे. परिशिष्ट अ प्रमाणे यादी जोडलेली आहे. त्याचप्रमाणे उपयोगात आणण्यासारख्या साहित्याची स्वंतत्र यादी परिशिष्ट ब प्रमाणे जोडलेली आहे.

यास्तव खालील नमुद प्रमाणे कार्यवाही करणे उचित राहील.

**१]** पिंपळगाव माळवी तलाव येथील निकामी झालेल्या पंपीग मशिनरी / साहित्य लिलाव पध्दतीने विक्री करणेपूर्वी शासन मान्य मुल्यांकन संस्थेमार्फत दर निश्चित करणे कामी पत्रव्यवहार करणे व दर निश्चिती नंतर महानगरपालिका स्टोअर विभागामार्फत लिलावाची प्रक्रिया राबविणे.

**२]** उपयोगात आणणे योग्य साहित्य पिंपळगाव माळवी येथून काढून विळद पंपीग स्टेशन येथे आणणे व कामाच्या आवश्यतेनुसार त्याची दुरूस्ती करून वापर करणे.

**३]** पाणी योजतेकरिताचे महानगरपालिका हद्दीबोहरील जमिनी खाली असलेल्या तत्कालीन पाणी योजनेचे १५" बीडाचे उर्वरीत पाईप आहे त्या स्थितीत व रनिंग मीटर पध्दतीने दर निश्चित करून खाजगी एजन्सीची नेमणूक करणे व त्यांचे मार्फत काढून लिलाव करणे.

इत्यादी प्रमाणे पुढील कार्यवाही करणेच्या संपूर्ण प्रस्तावास मा. स्थायी समितीची मंजूरी घेवून कार्यवाही करणे अशा आशयाच्या सादर प्रस्तावामध्ये वरील आधोरेखीत प्रमाणे कार्यवाहीस मा.आयुक्त साहेब यांनी प्रशासकीय मंजूरी दिलेली आहे.

तरी वरील आशयाचा प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर निर्णयास्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभेमध्यें वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्यें झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :-पिंपळगाव माळवी तलाव येथील निकामी झालेल्या पंपींग मशिनरी / साहित्याची लिलाव पध्दतीने विक्री करणेकामी आवश्यक उपाययोजना करून पुढील कार्यवाही करणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.उपायुक्त (सा.) डॉ.श्री. डोईफोडे साहेब :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- आवश्यक उपाययोजना काय ?

मा.उपायुक्त (सा.)डॉ.श्री. डोईफोडे साहेब :- मॅके.इंजि.श्री. निकम पी.जे. यांनी माहिती सांगावी.

पा.पु. विभाग प्रमुख मॅके.इंजि. श्री. निकम पी.जे. :- पिंपळगाव माळवी तलाव येथील निकामी झालेल्या पंपींग मशिनरी / साहित्य लिलाव पध्दतीने विक्री करणेपूर्वी शासन मान्य मुल्यांकन संस्थेमार्फत दर निश्‍चित करून निश्‍चिती नंतर महानगरपालिका स्टोअर विभागामार्फत लिलाव करावा लागेल.

मा.श्री. सप्रे द.ना. :- निविदा मागविणार काय ?

पा.पु. विभाग प्रमुख मॅके.इंजि. श्री. निकम पी.जे. :- होय गर्व्हेमेंट व्हॅल्यु प्रमाणे जुन्या मशिनरीची किंमती काढण्यांत येवून त्यानंतर त्यांचे आलेल्या निविदा दराबाबतचा तक्ता मा.स्थायी समिती मध्ये ठेवण्यात येईल.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सौ. गायकवाड नि.व.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**<u>ठरावः-</u>**अहमदनगर महानगरपालिकेच्या पिंपळगाव माळवी तलाव येथील निकामी झालेल्या पंपींग मशिनरी/ साहित्याची लिलाव पध्दतीने विक्री करणेकामी आवश्यक त्या उपाययोजना करून पुढील कार्यवाही करणेस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. भोसले गणेश पुंडलिक. सही /-

अनुमोदक :- मा.सौ. गायकवाड निलीमा वसंत सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-

सभापती ,

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१३**

विषय क्रमांक-७२ बुधवार दिनांक ११/०१/२०१२

ठराव क्रमांक-७२ बुधवार दिनांक ११/०१/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा अत्यावश्यक सेवेकरीता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात विद्युत पर्यवेक्षक, विजतंत्री , जोडारी, पंपचालक या तांत्रिक पदांवर अटी व शर्ती नुसार मानधनावर करारबध्द नियुक्ती करीता थेट पध्दतीने उमेदवारांच्या मुलाखती बाबत वर्तमान पत्रामध्ये जाहिरात प्रसिध्दीस देणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अ.नगर मनपा आस्थापन विभाग जा.क्र. वर्क. ९९ दि.२७/१२/२०११

विषय-पाणी पुरवठा अत्यावश्यक सेवेकरीता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात तांत्रिक पदांवर अटी व शर्ती नुसार मानधनावर करारबध्द नियुक्ती करीता थेट पध्दतीने उमेदवारांच्या मुलाखती बाबत वर्तमान पत्रामध्ये जाहिरात प्रसिध्दीस देणे बाबत.

सादर,

मा.मॅकेनिकल इंजि.,पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांनी पाणी पुरवठा अत्यावश्यक सेवेकरीता पाणीपुरवठा विभागास पुरेसा तांत्रिक कर्मचारी नसल्यमुळे शहरामधील तसेच उपनगरामध्ये पाणीपुरवठा वितरणात असंख्य तांत्रिक अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे नागरिकांचे मोर्चे,आंदोलने, रस्तारोको होत असतात.तसेच पाणी पुरवठा तांत्रिक विषयक दैनंदिन तक्रारी सुध्दा वाढतच आहेत. त्यामुळे पाणीपुरवठा विभागामध्ये तात्पुरत्या स्वरूपात तांत्रिक कर्मचा-यांची तात्काळ मानधनावर कंत्राटी करारानुसार कर्मचारी मिळणे बाबत वेळोवेळी संयुक्त बैठकामध्ये सुचना करून मागणी केलेली आहे.

मा.मॅकेनिकल इंजि., पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचे सुचनेच्या अनुषंगाने पाणी पुरवठा अत्यावश्यक सेवेकरीता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात तांत्रिक पदी मानधनावर करारबध्द नियुक्ती करीता आस्थापना कायम सुचीवरील रिक्त पदांची परिस्थीती पाहाता खालीलप्रमाणे सद्यस्थितीमध्ये पद संख्या , शैक्षणिक पात्रता, दरमहा मानधन इ. ठरविणे संयुक्तीक वाटते.

| अ. नं. | पदांचे नांव | पद संख्या | शैक्षणिक पात्रता (वाघ समिती मधील गृहीत धरून) | दरमहा मानधन |
|---|---|---|---|---|
| १ | विद्युत पर्यवेक्षक | १ | सार्वजनिकबांधकामविभागाचे विद्युत पर्यवेक्षकाचे प्रमाणपत्र धारक आवश्यक व कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य. | ७०००/- |
| २ | विज तंत्री | ३ | शालांत परिक्षा उत्तीर्ण व औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील दोन वर्षाचा विजतंत्री प्रमाणपत्र प्रशिक्षण वर्ग व कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य | ६०००/- |
| ३ | जोडारी | ४ | इयत्ता ७वी उत्तीर्ण व औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील जोडारी या पदाचे प्रमाणपत्र व कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य | ६०००/- |
| ४ | पंपचालक | ५ | शालांत परिक्षा उत्तीर्ण व औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील दोन वर्षाचा विजतंत्री प्रमाणपत्र प्रशिक्षण वर्ग व कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य | ६०००/- |

तरी पाणीपुरवठा अत्यावश्यक सेवेकरीता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वरील दर्शविल्या प्रमाणे तांत्रिकपदी मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द नियुक्ती बाबत सद्यस्थितीमध्ये पदांची संख्या, शैक्षणिक पात्रता,दरमहा मानधन व तात्पुरत्या स्वरूपात सद्यस्थितीमध्ये सहामहिन्या करीता कालावधी ठरवुन त्याप्रमाणे वर्तमानपत्रामध्ये थेट पध्दतीने(Walk In Interview) जाहिरात प्रसिध्दीस देणे करीता सदरचा प्रस्ताव मा.स्थायीसमिती पुढे निर्णयास्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभेमध्यें वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्यें झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- पाणी पुरवठा अत्यावश्यक सेवेकरीता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात तांत्रिक पदांवर अटी व शर्ती नुसार मानधनावर करारबध्द नियुक्ती करीता थेट पध्दतीने उमेदवारांच्या मुलाखती बाबत वर्तमान पत्रामध्ये जाहिरात प्रसिध्दीस देणे विषयी प्रस्ताव आहे.

पा.पु.विभाग प्रमुख श्री.निकम पी.जे.:- केंद्रशासित UIDSSMT योजने अंतर्गत केडगाव पाणीपुरवठा योजना, अहमदनगर फेज-२ पाणी पुरवठा योजनाचे कामे सुरू करणार, कामाच्या पुर्ततेसाठी इंजिनियरची आवश्यकता आहे.त्यासाठी याचबरोबर मानधनावर सहा इंजिनियर नेमणे आवश्यक आहे.

मा.श्री. कावरे द. ह. :- गरज आहे काय ?

पा.पु. विभाग प्रमुख श्री. निकम पी.जे. :- पाणी पुरवठ्या सारखा अत्यावश्यक सेवेसाठी तांत्रिक ज्ञान असलेल्याची आवश्यकता आहे. त्यामुळे सहा इंजिनियर्स पाणी पुरवठ्याकडे तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर सहा महिनाकरिता नेमणे गरजेचे आहे.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- बिगारी काम करणारे कामगार भरणे महत्वाचे आहे. तसेच फिटर, पंपचालक ची पण मागणी करा, मनपाचे फिटर सांगितलेल्या कामास हात लावत नाही.फिटर आमच्याकडेच खोदाई व इतर कामांसाठी कर्मचा-यांची मागणी करतात.

पा.पु.विभाग प्रमुख श्री. निकम पी.जे. :- प्रस्ताव ठेवलेला आहे. तो पुढच्या सभेत येईल.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा. तसेच पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचे मागणी नुसार सहा इंजिनियर मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात नेमणेबाबत कार्यवाही करावी.

मा.सौ. गायकवाड नि.व. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट व अत्यावश्यक सेवेकरीता सहा अभियंते तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने नेमणेकामी जाहिरात प्रसिध्दीस देणेबाबत सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :-**अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा अत्यावश्यक सेवेकरीता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात विद्युत पर्यवेक्षक, विजतंत्री , जोडारी, पंपचालक या तांत्रिक पदांवर अटी व शर्ती नुसार मानधनावर करारबध्द नियुक्ती करीता थेट पध्दतीने उमेदवारांच्या मुलाखती बाबत वर्तमान पत्रामध्ये जाहिरात प्रसिध्दीस देण्यांस मंजुरी देण्यांत येत आहे.

तसेच पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांनी मागणी केल्यानुसार सहा अभियंते तात्पुरत्या स्वरूपात सहा महिनाकरिता मानधनावर शासनाचे निर्देशाप्रमाणे शैक्षणिक पात्रता, अहर्तनुसार कंत्राटी करारानुसार करारबध्द करणेकामी मुलाखती बाबत वर्तमान पत्रामध्ये जाहिरात प्रसिध्दी देणेस मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. भोसले गणेश पुंडलिक. सही /-

अनुमोदक :- मा.सौ. गायकवाड निलीमा वसंत सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिति
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१३**

विषय क्रमांक-७३ बुधवार दिनांक ११/०१/२०१२

ठराव क्रमांक-७३ बुधवार दिनांक ११/०१/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे हद्दीतील रस्ता बाजु मांडणी फी ची वसुली खाजगी तत्वावर करणेकामी श्री. साई पेस्ट कंट्रोल यांनी दिलेल्या प्रस्तावानुसार निविदा दर रक्कम रूपये २५,०२,५०१/-चे निविदेतील अटी व शर्तीनुसार दरास मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अ.नगर मनपा मार्केट विभाग जा.क्र. १९३ दि.२/१/२०१२

विषय- रस्ता बाजु मांडणी फी ची वसुली खाजगी तत्वावर निविदा पध्दतीने देणे बाबत.

उपरोक्त विषयांकित अनुसरून विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की, रस्ता बाजु मांडणी फी कामाचे इ. टेंडर पध्दतीने जाहिर फेर टेंडर नं.१०३ दि.९/११/२०११ अन्वये प्रसिध्दीस दिलेल्या फेर निविदा सुचनेनुसार अहमदनगर महापालिकेकडेस खालील प्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | देकार रक्कम |
|---|---|---|
| १ | एक्सिम पेस्ट कंट्रोल | १३७५००० |
| २ | श्री. साई पेस्ट कंट्रोल | १८११००० |
| ३ | वैष्णवी कंपनी | १२५१००० |

वरील प्रमाणे श्री. साई पेस्ट कंट्रोल यांची देकार रक्कम रूपये १८११०००/- या सर्वात जास्त देकाराची निविदा प्राप्त झालेली आहे. मात्र सदरची निविदा ही अहमदनगर महानगरपालिकेने निश्चित केलेल्या किमान देकार रक्कम रूपये २५०००००/- (पंचवीस लाख रू. मात्र) पेक्षा कमी देकार रक्कमेची आलेली आहे. तरी ,मार्केट विभाग जा.क्र. १७२ दि.२८/११/११ अन्वये श्री. साई पेस्ट कंट्रोल वापी, गुजरात यास निविदेतील देकार रक्कमे संबंधी वाटाघाटी बाबत दि.३०/११/११ रोजी स. ११.०० वा. मा.आयुक्त साहेब यांच्या दालनामध्ये बैठक आयोजित केली असता, सदरची बैठक अपरीहार्य कारणास्तव होउ शकली नाही. त्यामुळे सदर साई पेस्ट कंट्रोल यांनी दि.३०/११/२०११ रोजी लेखी अर्ज दिलेला असुन सदरचा अर्ज मार्केट विभागास दि.१६/१२/२०११ रोजी प्राप्त झालेला आहे. सदर अर्जामध्ये देकार रक्कम रू.२५,०२,५०१/- (पंचवीस लाख दोन हजार पाचशे एक रू. फक्त ) नमुद करून सदरचा ठेका मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

तरी, सदरच्या वाटाघाटी नंतर श्री. साई पेस्ट कंट्रोल यांची रक्कम रू.२५,०२,५०१/-( अक्षरी रू. पंचवीस लाख दोन हजार पाचशे एक फक्त ) या रककमेचा प्रस्ताव निविदेतील अटी शर्ती नुसार मा. स्थायी समितीने निर्णय घेणेस्तव आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे सहाय्यक मुल्य निर्धारक कर संकलन अधिकारी यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभेमध्यें वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्यें झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- रस्ता बाजु मांडणी फी ची वसुली खाजगी तत्वावर करणेकामी प्रस्तावानुसार निविदा दरास मंजुरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. लोंढे सु.सो. :- किती निविदा आल्या ?

मार्केट विभाग प्र. ए.पी.दुर्गे :- तीन निविदा प्राप्त झाल्या १] एक्सिम पेस्ट कंट्रोल- रू.१३७५०००/-२] श्री. साई पेस्ट कंट्रोल-रू.१८११०००/- ३] वैष्णवी कंपनी- रू.१२५१०००/- या निविदा २५ लाखापेक्षा कमी आलेला आहेत. त्यानंतर श्री. साई पेस्ट कंट्रोल यांनी प्रस्ताव रक्कम रू.२५,०२,५०१/- असा दिला आहे.

मा.श्री. लोंढे सु. सो. :- निविदा भरल्या होत्या का ?

मार्केट विभाग (प्र.) ए.पी.दुर्गे :- होय

मा.श्री. लोंढे सु.सो. :- असे निगोशिएशन करता येते का ?

मा.उपायुक्त(कर) सौ.झगडे मॅडमः-पत्र देवुन संस्थाना निगोशिएशन साठी बोलावले होते. परंतु निगोशिएशनची बैठक अपरीहार्य कारणामुळै झाली नाही निविदा रकमेत निविदा धारकाने वाढ केल्यामुळे नियमानुसार निविदा प्रस्ताव स्विकारता येतो. मा. कमिशनर सोा. यांनी हा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभे पुढे निर्णयासाठी ठेवणेस मंजुरी दिलेली आहे.

मा.श्री. लोंढे सु.सो. :- रस्ता बाजु चार्जेस कसे लावणार ? दर एकच ठेवा. यापूर्वीचे तीन वर्षाची रस्ता बाजु फी वसुली किती झाली

मार्केट विभाग (प्र.) ए.पी.दुर्गे :- रस्ता बाजु फी वसुली सन २००८-०९ रू.८६३८२०/-, सन २००९-१० रू.७५९०४५/- व सन २०१०-२०११ रू.९६९१७०/- याप्रमाणे आहे. रस्ता बाजु फी वसुली पूर्वी प्रमाणेच ठरलेल्या दरानुसार करणेत येईल.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सौ. गायकवाड नि.व. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे हद्दीतील रस्ता बाजु मांडणी फी ची वसुली खाजगी तत्वावर करणेकामी श्री. साई पेस्ट कंट्रोल यांनी दिलेल्या प्रस्तावानुसार निविदा दर रक्कम रूपये २५,०२,५०१/- (रूपये पंचवीस लाख दोन हजार पाचशे एक मात्र)चे निविदेतील अटी व शर्तीनुसार दरास मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. भोसले गणेश पुंडलिक सही /-

अनुमोदक :- मा.सौ. गायकवाड निलीमा वसंत सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१३**

विषय क्रमांक-७४ बुधवार दिनांक ११/०१/२०१२

ठराव क्रमांक-७४ बुधवार दिनांक ११/०१/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे मुकुंदनगर येथे १५.०० लक्ष लिटर क्षमतेची उंच टाकी बांधणे व तार कंपाउड करणेकामी रक्कम रूपये २,४३,१२९/-चे अतिरीक्त खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अ.नगर मनपा पाणी पुरवठा विभाग दिनांक २०/१२/२०११

विषय- मुकूंदनगर येथे १५.०० लक्ष लिटर क्षमतेची उंच टाकी बांधणे व तार कंपाउड करणे.

मा. सादर,

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट की, मुकूंदनगर येथे १५.०० लक्ष लिटर क्षमतेची उंच टाकी बांधणे व तार कंपाउड करणे या कामास एकूण रक्कम रू.५५,९७,१५३/- च्या रक्कमेस प्रशासकीय मंजूरी मिळाली आहे.त्यानुसार रितसर निविदा मागवून कार्यारंभ आदेश क्र.पा.पु. ५६६ दि.१३/८/२००९ रोजी दिलेले आहेत. निविदेची किंमत रू.५२,७५,८२३/- इतकी असून स्विकृत निविदा धारकास सदर काम निविदेच्या सन २००७-२००८ चे जिल्हा दरसुचीनुसार ४२.३८% व चालू दरसूचीनुसार ४.५ % जादा दराने म्हणजेच रू.७५,११,७१७/- इतक्या रक्कमेस देण्यात आलेले आहे. सदर कामास मा.स्थायी समिती यांची दि.२८/७/२००९ अन्वये रू.७५,११,७१७/- इतक्या रककमेस मान्यता मिळालेली आहे. तथापी स्विकृत निविदेची किंमत रू.७५,११,२०४/- इतकी येते.

विषयांकित कामाचे अंदाजपत्रक तयार करताना १५.०० लक्ष लिटर क्षमतेचे उंच टाकीचे अंदाजपत्रक हे १२ मी. उंची गृहीत धरून करण्यात आलेले आहे. परंतु नंतर शहरात चालणारी सर्व कामे ही मा. केंद्रशासित UIDSSMT योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या शहर सुधारित पाणी पुरवठा योजना फेज-२ चे DPR नुसार करण्यात यावे असे ठरलेले असल्याने याकामाचा फेर आढावा घेतला असता त्याठिकाणी १५मी. उंचीची टाकी बांधणे आवश्यक आहे.त्यामुळे टाकीच्या मुळ अंदाजपत्रकातील बाब क्र.१ मध्ये म.जी.प्रा. च्या दरसुचीनुसार १२मी.उंचीपेक्षा प्रत्येक जास्त मीटरसाठी २% जादा दर द्यावा लागला. म्हणजेच एकूण किंमतीवर रू.२,४५,७१०/- (६% जादा) रक्कम शिवाय ठेकेदाराने भरलेला जादा देकार ४२.३८% द्यावा लागला मंजूर कामाअंतर्गत काटेरी तारेचे कूंपन गृहीत धरण्यात आले होते. तथापी तत्कालीन उपमहापौर यांचे सुचनेनुसार सदर ठिकाणी चेनलिंक कंपाउड चे काम प्रस्तावीत करण्यात आले व त्यानुसार बांधकाम विभागाच्या दरसुचीनुसार अतिरिक्त बाब क्र.१ अंदाजपत्रक तयार केले होते. त्यास रक्कम रू.२,४४,२७२/- इतका खर्च अपेक्षित होता. तथापी प्रत्यक्ष काम करीत असताना त्यासाठी रू. २,५७,७४२/- इतका खर्च झालेला आहे. सदर खर्च हा मा.स्थायी समिती यांनी मान्यता दिलेल्या खर्चापेक्षा रू.७९,४५९/- इतका जास्तीचा होता. व सदरच्या जादा खर्चास मा.स्थायी समितीने विषय क्रमांक ९२ दि.११/१/२०१० अन्वये मान्यता मिळालेली आहे.

प्रस्तावीत कामाअंतर्गत ठेकेदारांच्या स्वत: संकल्पावर आधारीत टाकीचे काम अपेक्षित आहे. सदर संकल्पनामध्ये प्रत्यक्ष साईटवर चाचणी खड्डा घेवून टाकीसाठी आवश्यक असलेली जमिनीची धारण क्षमता तपासणी करून योग्य असल्याने आढळून आल्यास त्यानुसार संकल्पन तयार करून सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार संबंधीत ठेकेदार यांनी योग्य ती कार्यवाही करून २ मीटर इतकी

खोली गृहीत धरून टाकीचे संकल्पन सादर केले होते.सदर संकल्पन निविदा अटी शर्तीनुसार मा.प्राचार्य,शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,औरंगाबाद यांचेकडून तांत्रिकदृष्टया तपासून घेतले आहे.

प्रत्यक्ष काम करित असताना २ मीटर खोलीवर टाकीसाठी आवश्यक धारण क्षमतेचा जमिनीचा थर आढळून आला. तथापी तत्कालीन मा.उपमहापौर, मा.उपायुक्त यांनी प्रत्यक्ष पाहणी करून टाकीची १२मीटर ऐवजी १५मीटर वाढलेली उंची लक्षात घेता कठीण (कातळ) थर लागू पर्यत खोदाई करण्याचे निर्देश दिले. व जोपर्यत खोदाई पूर्ण होत नाही. तोपर्यत पुढील काम थांबविणेचे सुचित केले.

यानंतर पुढील खोदाईसाठी संबंधीत ठेकेदार यांना म.न.पा.मार्फत सुचित करण्यात आले. व त्यांनी सुचनांचे पालन करून जमिन पातळी पासून ३.२३मीटर खोलीपर्यत खोदाई केली. व त्याठिकाणी कठीण स्तर (कातळ) आढळल्यानंतर सदर खोलीपासून टाकीचे फुटींग तयार करण्याचे काम डिझाइन यांचे तपासणी झाल्यावर संबंधीत ठेकेदार यांचेकडून हाती घेण्यात आले.मंजूर संकल्पनानुसार व प्रत्यक्ष काम केलेनुसार १.७३मीटर इतक्या जास्त खोलीचे काम संबंधीत ठेकेदाराकडून करण्यात आले. त्यानुसार वेळोवेळी मोजमाप पुस्तकात एकत्रिक नोंदी घेण्यात आलेल्या आहेत.

सदर जादा खोलीच्या खोदाईसाठी व त्या अनुषंगाने कॉलम च्या उंचीत वाढ झाल्याने होणा-या काँक्रीटच्या जादा परिमाण व जादा सळी साठी संबंधीत ठेकेदार यांनी अतिरिक्त बाबींची मागणी केलेली आहे. त्यानुसार म.जी.प्रा.च्या चालू दरसुचीनुसार अतिरिक्त बाब क्र.२ रक्कम रू.२,२९,६५९/- इतक्या खर्चाची तयार करण्यात आलेली असून त्यास संबंधीत ठेकेदार यांनी होकार दर्शविला आहे.

यामुळे सदर कामाची अतिरिक्त बाब क्र.१व २ सह एकूण किंमत रू.७९,९७,८६१/- इतकी होत आहे.

यास्तव

१] ठेकेदारानी केलेल्या व तत्कालीन मा.उपमहापौर , मा. उपायुक्त यांनी सुचित केलेनुसार कामास कार्योत्तर मंजूरी मिळणेस **/अ**

२] अतिरिक्त बाब क्र.१ मध्ये रू. १३४७०/- इतक्या होणा-या वाढीव रक्कमेस मंजूरी मिळणेस **/अ**

३] अतिरिक्त बाब क्र.२ चे रक्कम रू.२,२९,६५९/- मंजूरी मिळणेस **/अ**

ऑफिस रिपोर्ट मा.स्थायी समितीच्या मंजूरीस्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे पाणी पुरवठा विभाग कनिष्ठ अभियंता यांचा अहवाल असे.

पाणी पुरवठा वि. इंजि.:- वाढीव खर्चास मान्यता घेणेसाठी रिपोर्ट मा.स्थायी समिती यांचेकडे ठेवणेस मान्यतेस्तव सादर.

पाणी पुरवठा प्रमुख मॅके. इंजि. :- रू. १३४७०/- व रू.२,२९,६५९/- चे वाढीव खर्चास व कामास मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

मुख्यलेखा परिक्षक/मुख्य लेखाअंतर्गत :- प्रस्तावाप्रमाणे बाब क्र.१ व २ मिळून रक्कम रू.२,४३,१२९/- चे वाढीव खर्चास व कामास मा.स्थायी समितीचे मान्यतेकरिता मा.स्थायी समितीसमोर ठेवणेस मान्यतेस्तव सादर.

मा.उपायुक्त (सा.) साहेब :- प्रस्तावीत **"अ"** प्रमाणे मान्यतेस्तव सादर. दि.२०/१२/२०११

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि.२७/१२/२०११

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभेमध्यें वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्यें झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- मुकुंदनगर येथे १५.०० लक्ष लिटर क्षमतेची उंच टाकी बांधणे व तार कंपाउड करणेकामी अतिरीक्त खर्चास कार्यात्तर मंजुरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री. लोंढे सु.सो. :- एस्टीमेंट कोणी केले ?

पा.पु.वि.प्रमुख मॅके.इंजि. श्री. निकम पी.जे. :- एस्टीमेंट पाणीपुरवठा विभागामार्फत करण्यात आले. गर्व्हे इंजि. औरंगाबाद यांचेकडून डिझाईन प्रमाणे कामाचे खोदाई करताना खोदाई नंतर खोल कठीण (कातळ) थर लागु पर्यत खोदाई केलेली आहे. त्यामुळे जादा खोदाईचे अतिरीक्त बीलाची मागणी केलेली आहे.

मा.सौ. गायकवाड नि.व. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :-**अहमदनगर महानगरपालिकेचे मुकुंदनगर येथे १५.०० लक्ष लिटर क्षमतेची उंच टाकी बांधणे व तार कंपाउड करणेकामी रक्कम रूपये २,४३,१२९/- (रूपये दोन लाख त्रेचाळीस हजार एकशे एकोणतीस मात्र )चे अतिरीक्त खर्चास कार्यात्तर मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ.गायकवाड निलीमा वसंत सही /-

अनुमोदक :- मा.श्री.भोसले गणेश पुंडलिक सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-

सभापती,

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१३**

विषय क्रमांक-७५ बुधवार दिनांक ११/०१/२०१२

ठराव क्रमांक-७५ बुधवार दिनांक ११/०१/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना करीता डॉ. रूपाली आनंद कुलकर्णी यांची तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकिय अधिकारी या पदावर अटी व शर्ती प्रमाणे कंत्राटी करारानुसार मानधनावर करार बध्द नेमणूकीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अ.नगर मनपा आस्थापना विभाग दिनांक २६/१२/२०११

संदर्भ :- मा.मुख्य वैद्यकीय अधिकारी यांचे कडील जा.क्र. कै.बा.दे. दवा. व सुतिका गृह ६१८ दिनांक २२/१२/२०११ चा प्रस्ताव.

सादर,

विनंती अहवाल सादर करण्यांत येतो की, मा.मुख्य वैद्यकीय अधिकारी यांनी त्यांचे कडील जा.क्र. कै.बा.दे.दवा. व सुतिका गृह ६१८ दिनांक २२/१२/२०११ अन्वये प्रस्ताव सादर करून "डॉ.सौ. रूपाली आनंद कुलकर्णी यांची वैद्यकीय अधिकारी या पदावर कंत्राटी पध्दतीने सहा महिन्याकरीता नेमणूक करण्यांत आलेली होती. सदरच्या नेमणुकीचा कालावधी दिनांक ०१/०५/२०११ ते ३०/१०/२०११ असा असुन सदरचा कालावधी दिनांक ३१/१०/२०११ रोजी संपत आहे. सदरच्या कालावधीमध्ये त्यांचे काम समाधानकारक आहे. त्यांनी पुढील कालावधीसाठी पुनर्नेमणुक करणेबाबत विनंती अर्ज केलेला आहे. तरी त्यांना नियमाप्रमाणे एक दिवसाचा तांत्रिक खंड देवुन २/११/२०११ ते १/५/२०१२ अखेर सहा महिन्याकरीता वैद्यकीय अधिकारी या पदावर पुनर्नेमणुक करणेस शिफारस आहे." असे नमुद करून सुचित केलेले आहे.

अहमदनगर महानगरपालिकेमध्ये कै.बाळासाहेब दवाखाना करिता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदी मानधनावर करारबध्द नियुक्ती करिता उमेदवारांच्या थेट पध्दतीने (Walk In Interview) नुसार मुलाखती बाबत वर्तमान पत्रामध्ये जाहिरात प्रसिध्दीस देवुन उमेदवारांच्या दि.७/४/२०११ रोजी मा. आयुक्त तथा अध्यक्ष, निवड समिती मनपा अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली मुलाखती घेण्यात येवुन डॉ. सौ. रूपाली आनंद कुलकर्णी यांची निवड करण्यांत येवुन जा.क्र. आस्था./कंत्राटी करार नेमणुक २१५ दिनांक २६/४/२०११ अन्वये कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदावर अटी व शर्तीनुसार सहा महिन्याकरीता दरमहा रूपये १५,०००/- मानधनावर करारबध्द नियुक्ती करण्यांत आलेली होती.

यापुर्वी फिरत्या दवाखाना करिता तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदी कंत्राटी करारा नुसार दरमहा करारबध्द नियुक्ती मानधनावरचा प्रस्ताव निर्णयासाठी मा.स्थायी समिती कडे पाठविण्यांत आलेला होता. सदर प्रस्तावावर मा.स्थायी समितीने ठराव क्रमांक १३ दिनांक ३०/४/२०१० अन्वये ठराव पारित होवुन त्यामध्ये परिच्छेद २ मध्ये खालील प्रमाणे ठराव मध्ये नमुद केलेले आहे.

"तसेच नागरिकांच्या सुविधेच्या दुष्टिकोनातुन फिरता दवाखाना तसेच आरोग्याच्या सर्व सेवा अत्यावश्यक असल्याने या पुढे वैद्यकीय अधिकारी, लॅब टेक्नीशियन नर्सेस इ.चे काम समाधानकारक असल्यास त्यांचे पुनर्नेमणुक १ दिवस तांत्रिक खंड देवुन त्यांना नेमणुका देण्यांत याव्यात व प्रस्ताव अंतीम मंजूरीसाठी मा. स्थायी समितीकडे पाठविण्यांत यावेत." असे सुचित केलेले आहे.

वरील कै.बा.दे.वा. व सुतिका गृह जा.क्र.६१८ दिनांक २२/१२/२०११ च्या प्रस्तावाच्या अनुषंगाने अत्यावश्यक सेवे करीता कै.बा. दे. वा. व सुतिका गृह करीता डॉ.सौ. रूपाली आनंद कुलकर्णी यांची कंत्राटी कराराप्रमाणे अटी व शर्ती नुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदी एक दिवसाचा तांत्रिक खंड देवुन दिनांक २/११/२०११ ते १/५/२०१२ अखेर या कालावधीमध्ये सहा महिन्या करीता दरमहा रूपये १५,०००/- या मानधनावर करारबध्द नेमणुकी बाबत आदेश निर्गमित करणेस व सदर कंत्राटी करारानुसार केलेल्या कालावधीतील करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे करिता सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १३ दिनांक ३०/४/२०१० च्या ठरावाच्या अनुषंगाने मा.स्थायी समिती कडे पाठविणे करिता मा.प्र. मुख्या लेखा परिक्षक व मा. मुख्य लेखाधिकारी यांचा अभिप्राय होवुन सदरचा प्रस्ताव मंजुरी करीता निर्णयास्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

--**--

मुख्यलेखापरिक्षक/ मुख्यलेखाअधिकारी :- प्रस्तावाप्रमाणे मा.स्थायी समिती ठराव क्र.१३ दि.३०/४/२०१० मधील परिच्छेद क्र.२ प्रमाणे डॉ.सौ. रूपाली आनंद कुलकर्णी यांना ६ महिने कंत्राटी कराराप्रमाणे अटी व शर्ती नुसार दरमहा रू.१५,०००/- मानधनावर करारबध्द नेमणुकीस कार्योत्तर मान्यतेकरिता मा.स्थायी समिती समोर ठेवणेस मान्यतेस्तव सादर.

मा.उपायुक्त (सा.) साहेब :- प्रस्तावाप्रमाणे संबंधीताचा कार्योत्तर मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर ठेवणेस मान्यतेस्तव सादर. दि.२९/१२/२०११

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दिनांक २/१/२०१२

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना करीता डॉ. रूपाली आनंद कुलकर्णी यांची तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकिय अधिकारी या पदावर कंत्राटी करारानुसार मानधनावर करार बध्द नेमणूकीस कार्योत्तर मंजुरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

आरोग्य वै.अधिकारी डॉ.श्री. बोरगे :- रूपये १५०००/- मानधन देणार.

मा.श्री. लोंढे सु.सो. :- किती जागा आहेत. नविन आहेत का ?

आरोग्य अधिकारी डॉ.श्री. बोरगे :- नवीन जागा नाहीत. पुर्वीचे डॉक्टर असुन कार्यात्तर मंजुरी मिळणेबाबतचा प्रस्ताव आहे.

मा.श्री. लोंढे सु.सो. :- डॉक्टर काम करत नाही. खाजगी दवाखान्यांत पेशंट पाठवतात.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- महिन्यात डिलीव्हरी किती होतात ?

आरोग्य वै.अधिकारी डॉ.श्री. बोरगे :- महिन्याला ४५० ते ५०० डिलीव्हरी घेतात. परंतु मानधन कमी आहे. मानधन वाढवावे लागेल.

मा.श्री. लोंढे सु.सो. :- तसे पत्र दया

आरोग्य वै.अधिकारी डॉ. बोरगे :- डॉक्टरांची संख्या कमी आहे.तसा प्रस्ताव देण्यांत येईल.

मा.सौ. गायकवाड नि.व. :- ऑफिस रिपोर्ट विषय क्र. ७५ ते ७६ चा मंजूर करावा.

मा.श्री.भोसले ग.पुं. :- ऑफिस रिपोर्ट विषय क्र.७५ ते ७६ चा मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना करीता डॉ. रूपाली आनंद कुलकर्णी यांची तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकिय अधिकारी या पदावर अटी व शर्ती प्रमाणे कंत्राटी करारानुसार दिनांक२/११/२०११ते १/५/२०१२अखेर या कालावधीमध्ये सहा महिन्याकरीता दरमहा रूपये १५,०००/-(रूपये पंधरा हजार फक्त) या मानधनावर करार बध्द नेमणूकीस कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ. गायकवाड निलीमा वसंत. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. भोसले गणेश पुंडलिक सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१३**

विषय क्रमांक-७६ बुधवार दिनांक ११/०१/२०१२

ठराव क्रमांक-७६ बुधवार दिनांक ११/०१/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना करीता डॉ. कांचन सुरेंद्र रच्चा यांची तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकिय अधिकारी या पदावर अटी व शर्ती प्रमाणे कंत्राटी करारानुसार मानधनावर करार बध्द नेमणूकीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट..

**प्रस्तावाचा मजकूर :-** अ.नगर मनपा आस्थापना विभाग दिनांक २६/१२/२०११

संदर्भ :- मा.मुख्य वैद्यकीय अधिकारी यांचे कडील जा.क्र. कै.बा.दे. दवा. व सुतिका गृह ६१७ दिनांक २२/१२/२०११ चा प्रस्ताव.

सादर,

विनंती अहवाल सादर करण्यांत येतो की, मा.मुख्य वैद्यकीय अधिकारी यांनी त्यांचे कडील जा.क्र. कै.बा.दे.दवा. व सुतिका गृह ६१७ दिनांक २२/१२/२०११ अन्वये प्रस्ताव सादर करून "डॉ.सौ. कांचन सुरेंद्र रच्चा यांची वैद्यकीय अधिकारी या पदावर कंत्राटी पध्दतीने सहा महिन्याकरीता नेमणूक करण्यांत आलेली होती. सदरच्या नेमणुकीचा कालावधी दिनांक २८/४/२०११ ते २७/१०/२०११ असा असुन सदरचा कालावधी दिनांक २७/१०/२०११ रोजी संपत आहे. सदरच्या कालावधीमध्ये त्यांचे काम समाधानकारक आहे. त्यांनी पुढील कालावधीसाठी पुनर्नेमणुक करणेबाबत विनंती अर्ज केलेला आहे. तरी त्यांना नियमाप्रमाणे एक दिवसाचा तांत्रिक खंड देवुन २९/१०/२०११ ते २८/४/२०१२ अखेर सहा महिन्याकरीता वैद्यकीय अधिकारी या पदावर पुनर्नेमणुक करणेस शिफारस आहे." असे नमुद करून सुचित केलेले आहे.

अहमदनगर महानगरपालिकेमध्ये कै.बाळासाहेब दवाखाना करिता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदी मानधनावर करारबध्द नियुक्ती करिता उमेदवारांच्या थेट पध्दतीने **(Walk In Interview)** नुसार मुलाखती बाबत वर्तमान पत्रामध्ये जाहिरात प्रसिध्दीस देवुन उमेदवारांच्या दि.७/४/२०११ रोजी मा.आयुक्त तथा अध्यक्ष, निवड समिती मनपा अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली मुलाखती घेण्यात येवुन डॉ. सौ. कांचन सुरेंद्र रच्चा यांची निवड करण्यांत येवुन जा.क्र. आस्था./कंत्राटी करार नेमणुक २१५ दिनांक २६/४/२०११ अन्वये कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदावर अटी व शर्तीनुसार सहा महिन्याकरीता दरमहा रूपये १५,०००/- मानधनावर करारबध्द नियुक्ती करण्यांत आलेली होती.

यापुर्वी फिरत्या दवाखाना करिता तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदी कंत्राटी करारा नुसार दरमहा करारबध्द नियुक्ती मानधनावरचा प्रस्ताव निर्णयासाठी मा.स्थायी समिती कडे पाठविण्यांत आलेला होता. सदर प्रस्तावावर मा.स्थायी समितीने ठराव क्रमांक १३ दिनांक ३०/४/२०१० अन्वये ठराव पारित होवुन त्यामध्ये परिच्छेद २ मध्ये खालील प्रमाणे ठराव मध्ये नमुद केलेले आहे.

"तसेच नागरिकांच्या सुविधेच्या दुष्टिकोनातुन फिरता दवाखाना तसेच आरोग्याच्या सर्व सेवा अत्यावश्यक असल्याने या पुढे वैद्यकीय अधिकारी, लॅब टेक्नीशियन नर्सेस इ.चे काम समाधानकारक असल्यास त्यांचे पुनर्नेमणुक १ दिवस तांत्रिक खंड देवुन त्यांना नेमणुका देण्यांत याव्यात व प्रस्ताव अंतीम मंजूरीसाठी मा. स्थायी समितीकडे पाठविण्यांत यावेत." असे सुचित केलेले आहे.

वरील कै.बा.दे.वा. व सुतिका गृह जा.क्र.६१७ दिनांक २२/१२/२०११ च्या प्रस्तावाच्या अनुषंगाने अत्यावश्यक सेवे करीता कै.बा. दे. वा. व सुतिका गृह करीता डॉ.सौ. कांचन सुरेंद्र रच्चा यांची कंत्राटी कराराप्रमाणे अटी व शर्ती नुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदी एक दिवसाचा तांत्रिक खंड देवुन दिनांक २९/१०/२०११ ते २८/४/२०१२ अखेर या कालावधीमध्ये सहा महिन्या करीता दरमहा रूपये १५,०००/- या मानधनावर करारबध्द नेमणुकी बाबत आदेश निर्गमित करणेस व सदर कंत्राटी करारानुसार केलेल्या कालावधीतील करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे करिता सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १३ दिनांक ३०/४/२०१० च्या ठरावाच्या अनुषंगाने मा.स्थायी समिती कडे पाठविणे करिता मा.प्र. मुख्या लेखा परिक्षक व मा. मुख्य लेखाधिकारी यांचा अभिप्राय होवुन सदरचा प्रस्ताव मंजुरी करीता निर्णयास्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

--**--

मुख्य लेखापरिक्षक/मुख्यलेखाअधिकारी :- प्रस्तावाप्रमाणे मा.स्थायी समिती ठराव क्र.१३ दि.३०/४/२०१० मधील परिच्छेद क्र.२ प्रमाणे डॉ.सौ.कांचन सुरेंद्र रच्चा यांना ६ महिने कंत्राटी कराराप्रमाणे अटी व शर्ती नुसार दरमहा मानधन रक्कम रू.१५,०००/- वर नियुक्ती देणेस कार्योत्तर मान्यतेकरिता मा.स्थायी समिती समोर ठेवणेस मान्यतेस्तव सादर.

मा.उपायुक्त (सा.) साहेब :- प्रस्तावाप्रमाणे मा.स्थायी समिती समोर कार्योत्तर मंजुरीच्या निर्णयास्तव व ठेवण्यास मान्यतेस्तव सादर. दि.२९/१२/२०११

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दिनांक २/१/२०१२

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**ठराव :-**अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना करीता डॉ. कांचन सुरेंद्र रच्चा यांची तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकिय अधिकारी या पदावर अटी व शर्ती प्रमाणे कंत्राटी करारानुसार दिनांक २९/१०/२०११ ते २८/४/२०१२ अखेर या कालावधीमध्ये सहा महिन्याकरीता दरमहा रूपये १५,०००/-(रूपये पंधरा हजार फक्त) या मानधनावर करार बध्द नेमणूकीस कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ. गायकवाड निलीमा वसंत. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. भोसले गणेश पुंडलिक सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका